# ब्रह्माबाबांना श्रध्दा सुमने........

१८ जानेवारी हा दिवस ब्रह्माकुमारी परिवारातील अतिषय संवेदनशील व स्नेहसंपन्न दिवस होय. याच दिवशी १९६९ च्या तिथीस संस्थेचे संस्थापक 'प्रजापिता ब्रह्मा' यांनी आपली स्थूल काया सोडून सूक्ष्म काया धारण केली. त्या निमित्त ब्रह्माबाबांना श्रध्दा सुमने ............

सिंध कराचीत १८७६ साली दादा लेखराज यांचा जन्म कृपलानी घरात झाला. लहानपणापासून दादा लेखराज यांचा जन्म कृपलानी घरात झाला. लहानपणापासून दादा लेखराज कुशाग्र बुद्धीचे होते. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने ते आपल्या चुलत भावाच्या भुसार दुकानात काम करीत. त्यांना गोर गरीबा विषयी खूप कनवला होता. त्यामुळे ते गरीबांना मापापेक्षा जास्त माल देत. यामुळेच त्यांच्या चुलत भावाने त्यांना दुकानातून काढून टाकले. याच घटनेने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. पुढे त्यांनी मुंबईला जावून जवाहिरातल्या धंद्या विषयी ज्ञान संपादन केले. अतिशय पारखी दृष्टी लाभलेले दादा लेखराज अल्पावधीतच जवाहीरातल्या धंद्यात पारंगत झाले. त्यांनी आपला व्यापार कलकत्ता, राजस्थान, मुंबईतच नव्हे तर भारताबाहेर सुद्धा वाढविला. तसे त्यांचे रहाणीमान अतिशय सोज्वळ व साधे होते. शाकाहारी जीवन पद्धती सोबत राजकुलाचीत संस्कार हि त्यांच्यात होते. मोठे मोठे संस्थानिक, राजे यांच्याकडे दादांना बोलावणे येत असे. राजमहालात दादांचे विशेष आदरातिथ्य होत असे. दादांचा तो राजबेंडा बाणा पाहून,बऱ्याच वेळेस तेथील राजे म्हणत लखीराज बाबु राजाला शोभेल असे सर्व संस्कार आपल्या जवळ आहेत तरी राजे आम्हांस केले आपणास नाही ही भगवंताची चूकच म्हणावी !परतू त्यांना कोठे ठाऊक, की एका विशिष्ठ संस्थानाचेच काय पण भविष्यात संपूर्ण सृष्टीचे महाराजा पद दादा लेखराज यांना लाभणारा होय, गृहस्थ जीवनात सफल झालेले दादा लेखराज वर्तमान स्थितीच्या पुरुषार्थाने भविष्यात विश्वराज्य अधिकारी पद व दुहेरी मुकुट (देवपद) चे मानकरी होतात.

* दादा लेखराज ते प्रजापिता ब्रह्मा *

दादा लेखराज खुप धार्मिक व पापभीरु होते. कोणीही त्यांच्या दारातून रिक्त हस्ते परतत नसे. दान धर्मा सोबत ते गुरूंची हि सेवा करत. गुरूची आज्ञा म्हणजे 'काळाची आज्ञा' असे ते समजत. त्यांच्या जीवनात त्यांनी १२ गुरु केले होते, नित्य नियमाने गीतेचे पठन करित. प्रवासात सुद्धा त्यांचा नियम चुकत नसे.

इ.स.१९३६ च्या काळात म्हणजे वयाच्या ६० व्या वर्षी दादांमध्ये अचानक बदल घडू लागतात. त्यांना एकांत वास प्रिय वाटू लागतो. ते मनन चिंतानातच मग्न असत. यातच त्यांना विविध साक्षात्कार झाले. प्रथम त्यांना विष्णूचा साक्षात्कार झाला. 'अहम विष्णु चतुर्भुज-ततत्वम' असे शब्द त्यांना ऐकू आले ही गुरूचीच कृपा असे समजून त्यांनी मोठ्या हर्षाने गुरूंना वरील वृत्तांत सागितले. परंतु गुरूजी ह्या विषयी पूर्ण अनभिज्ञ होते. असा साक्षात्कार घडविणे त्यांच्या आवाक्याबाहेरचे होते. मग दादा अधिकाधिक विचारांमध्ये मग्न राहू लागले. साक्षात्कारच्या शृंखलेत त्यांना पुढे ज्योतिर्लिंगम शिव परमात्म्याचा तद्पश्चात महाविनाशाचा साक्षात्कार घडला. यात त्यांनी अतिशय विदारक दृश्य पाहिले. प्रचंड अग्नी उसळत आहे. भयकर बॉम्ब वर्षाव होत आहे. हे बॉम्ब फुटून त्याद्वारे खुप मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्त हानी होत आहे. त्यांना हे बॉम्ब महाभारतात वर्णिलेल्या 'ब्रह्मास्त्र' व 'अग्निबाण' सारखे भासले विशेष म्हणजे १९३६ च्या काळात अणुबॉम्बचा वापर कोठे ही झालेला नव्हता. अशा बॉम्ब्स विषयी दादा अजाण होते. तरी ही त्यांना असे भयावह दृश्य कसे दिसले ? याचा ते अधिकाधिक खोल विचार करू लागले. अशा प्रकारे विनाशाच्या साक्षात्कारानंतर त्यांचे मन संसारापासून विभक्त होवू लागले. आपल्या व्यापारामधील भागीधारी काढून आपला वेळ विचार मंथनात व दिव्य अनुभवात घालवू लागले. त्यानंतर पुढे त्यांना पुन:श्च आत्म्याचा साक्षात्कार घडतो. या साक्षात्काराच्या शृंखलेत त्यांना पुन्हा श्रीविष्णुचा साक्षात्कार घडतो. त्या बरोबर श्रीविष्णूच्या विविध आवतारांचे दृश्य दिसतात 'अहम चतुर्भुज ततत्वम' असे वाक्य त्यांच्या कानात गुंजतात, असे साक्षात्कार कोण करत आहे ? या विषयी दादांना कुतुहल जागृत होते.

एके दिवशी दादांकडे दिव्य सत्संगाचा कार्यक्रम होता. त्या दिवशी दादांचे उठणे – बसणे मोठे अलौकिक वाटत होते. दादा कधी ही भर सभेतून उठत नसे परंतु त्या दिवशी ते उठून आपल्या खोलीत जातात. या गोष्टी ची दखल होण्यासाठी वा दादांना काय झाले हे पहाण्यासाठी त्यांची सून ब्रिजइंद्रा

खोलीत जाते. तेथे ब्रिजइंद्रा यांना मोठे अलौकिक दृश्य दिसले. त्या पहातात दादांचे डोळे अतिषय लाल झाले होते. तर चेहऱ्या वर सुध्दा तेज पसरले होते. संपूर्ण खोलीत लाल प्रकाश पसरला होता इतक्यात दादांच्या मुखरविंदवाटे आवाज निघतो...

'निजानंद स्वरूपम , शिवो S हम..शिवो S हम'

'ज्ञान स्वरूपम, शिवो S हम..शिवो S हम'

'प्रकाश स्वरूपम, शिवो S हम..शिवो S हम'

संपूर्ण वातावरण अतिषय अद्भुत झाले होते.नंतर दादांचे डोळे बंद झाले. दरम्यान उपस्थित असलेल्या ब्रिजइंद्राजींना सुध्दा अशरीरी स्थितीचा अनुभव झाला. डोळे उघडताच दादा खोलीत सर्वत्र आश्चर्याने पाहू लागतात.तो दिव्य अनुभव दादा त्यांची सून ब्रिजइंद्रा यांना सांगतात, एक प्रकाश होता, कोणीतरी शक्ती होती, एक नवीनच जग होते त्या जगाच्या फार दूरवर आकाशात ताऱ्यासारखे काहीतरी होते. ते जेव्हा खाली उतरत तेव्हा कोणी राजकुमार तर कोणी राजकुमारी बनत. त्या प्रकाशस्वरूप शक्तीने म्हटले, हे असे जग तू निर्माण करावयास हवे.

अर्थातच हेच दादा लेखराज यांच्या तनात निराकार शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण होते. त्यांनीच दादांना नवीन सृष्टीच्या स्थापनेचे निर्देश दिले होते. या घटने नंतर दादा लेखराज हे इतरांना ईश्वरीय प्रेरणेव्दारे ईश्वरीय ज्ञान देवू लागतात. महिला व भगिनींची एक ट्रस्ट स्थापून दादा त्यांच्या समोर आपली चल अचल सम्पत्ती समर्पित करतात. पुढे जावून हे ट्रस्ट 'प्रजापिता ब्रह्मकुमारीस ईश्वरीय विश्व विद्यालय' या विश्वव्यापी संस्थेच्या नावारुपात येते. तसेच सर्व वत्सांना दादा पीतृवत स्नेह देवून स्वर्णिम युग स्थापनेची धुरा उचलतात म्हणूच त्यांना प्रजापित्ता ब्रह्मा असे संबोधन स्वयं निराकार शिव परमात्मा करतात.

१९५० मध्ये ईश्वरीय विद्यालयाचे स्थलांतर ईश्वरीय आज्ञेनुसार कराची हून भारतातील अबू पर्वत येथे स्तलांतरित करण्यात आले. येथूनच ब्रह्मा बाबा भारतभर ईश्वरीय विश्वविद्यालयांच्या शाखा उघडतात. संपूर्ण कारभार पाहण्यासोबतच ब्रह्मा बाबा आपल्या आन्तरिक स्थितीत स्थित होत जातात. त्यांच्या या अलौकिक स्थितींची अनुभूती अनेकांना होत असे शेवटी १८ जानेवारी १९६९ रोजी निराकारी, निर्विकारी  निहंकारी भव चा अंतिम दिव्य उपदेश देवून प्रजापिता ब्रह्मा बाबा आपले स्थूल व साकार कलेवर सोडून आपल्या अव्यक्त स्थितीत प्राप्त होतात.

आज हि अनेक ब्रह्मावत्स ब्रह्माबाबानी निर्देशित केलेल्या वाटेवर चालून आपले जीवन दिव्य व ईश्वरिय प्राप्ती संपन्न बनवित आहेत.

* * * *